# प्रेस नोट ता. ०८/०६/२०२०

## पिंपळे सौदागर येथील खुनाच्या प्रकरणातील आरोपीस गुन्हे शाखा युनिट- ४, पिंपरी चिंचवड कडुन अवघ्या दोन तासात अटक

यातील हकिगत अशी की, दि. ०७/०६/२०२० रोजी २१:०० वा दरम्यान दत्त मंदिरा जवळ, पिंपळे सौदागर या ठिकाणी प्रेम प्रकरणाच्या वादातुन विराज उर्फ मंगेश विलास जगताप, वय- २० वर्षे रा- तक्षशिला नगर, पिंपळे सौदागर या तरुणाला आरोपी नामे हेमंत कैलास काटे व त्यांच्या पाच साथीदारांनी मयत हा त्याच्या बहिणीवर प्रेम करतो या कारणावरुन त्याला रस्त्याने जात असताना कट रचुन टेम्पो ने मागुन धडक देवुन खाली पाडुन लोखंडी रॉड व दगडाने मारहाण करुन जबर जखमी केले होते. त्यानंतर सदर तरुणास उपचार कामी हॉस्पीटल मध्ये ॲडमीट केले होते. दि. ०८/०६/२०२० रोजी १५:४५ वा दरम्यान तरुण मयत झाल्याने या बाबत सांगवी पोलीस ठाणे येथे गु.र.नंबर-३०६/२०२० भा.दं.वि. कलम ३०२, १२० (ब), १४३, १४७,१४८, १४९ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरचा प्रकार हा गंभीर स्वरुपाचा असल्याने त्यातुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याने मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेस समांतर तपास करुन ताबडतोब सर्व आरोपी अटक करण्याचे आदेश दिले. त्यानुसार मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मोहन शिंदे, गुन्हे शाखा युनिट-४ यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा सम्ांतर तपास करत असताना **पोहवा/ २५० जाधव, पोना/ ४७० असवले, पोशि/ ४९८ पांढरे** यांना माहिती मिळाली की, आरोपी नामे १) हेमंत कैलास काटे,२) सागर जगदीश काटे, व दोन विधीसंघर्षीत बालक हे पिंपळे सौदागर परिसरात एका घरात लपलेले असुन ते कुठेतरी लांब पळुन जाण्याच्या तयारीत आहेत. तेव्हा मिळालेल्या बातमीच्या अनुशंगाने सदर आरोपीना दत्त मंदिर रोड, पिंपळे सौदागर परिसरातील एका घरातुन सहा. पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख यांनी स्टाफच्या मदतीने अवघ्या दोन तासात ताब्यात घेवुन पुढील कारवाई कामी सांगवी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील, (गुन्हे शाखा) यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहा. पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ नारायण जाधव, संजय गवारे, प्रविण दळे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ, शावरसिध्द पांढरे, पोना/ संतोष असवले, लक्ष्मण आढारी, मोहम्मद गौस नदाफ, तुषार शेटे, वासुदेव मुंढे पोशि/ प्रशांत सैद, सुरेश जायभाये, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, तुषार काळे, सुनिल गुटे गुन्हे शाखा युनिट-४ यांनी केली आहे.